दैनिक महाराष्ट्र **सूर्योदय**

www.esuryodaylive.com

Email : suryodaykokan.123@gmail.com

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक), किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)








छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक ६० || बुधवार २५ फेब्रुवारी २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये


# हयातनगर येथे अवकाळीचा तडाखा; हयातनगर परिसरात गहू, ज्वारी आडवी.निसर्गाच्या लहरीपणाचा शेतकऱ्यांना मोठा फटका; नुकसानाची पहाणी करण्याची मागणी

हिंगोली प्रतिनिधी,
शिवराम कदम

वसमत तालुक्यातील हयातनगर आणि परिसराला सोमवारी (२३ फेब्रुवारी) सायंकाळी अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास झालेल्या वादळी वाऱ्यासह अर्धा तास पडलेल्या मुसळधार पावसामुळे काढणीला आलेल्या गहू आणि ज्वारीच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे आधीच संकटात असलेला बळीराजा पुन्हा एकदा हवालदिल झाला आहे.ङ्गनिसर्गाचे शुक्लकाष्ट संपेनाङ्गयावर्षी सुरुवातीपासूनच शेतकरी संकटात सापडला आहे. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे .नुकसान झाले होते. त्यातून सावरत असतानाच आता रब्बी हंगामातही निसर्गाचे शुक्लकाष्ट शेतकऱ्यांच्या मागे लागले आहे. हातातोंडाशी आलेला घास या अवकाळी पावसाने हिरावून घेतल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.ङ्गपिकांचे नुकसानङ्गहयातनगर परिसरात गहू आणि ज्वारीची पिके जोमात होती. मात्र, सोमवारी झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पिके जमिनीला टेकली आहेत.



पावसामुळे पिकांच्या गुणवत्तेवर परिणाम होणार असून उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.ङ्गशेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रियाङ्ग ''माझं एक एकर ज्वारी आणि तीन एकर गहू काल झालेल्या पावसामुळे व वाऱ्याने आडवा पडला आहे. वर्षभर मेहनत करून पीक हाती येण्याच्या वेळेस निसर्गाने घाला घातला. माझे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.'' कामाजी नामदेव सारंग (बाधित शेतकरी)ङ्ग ङ्ग ''माझा सुद्धा एक एकर गहू जमिनीवर आडवा झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला. आता जगायचे कसे, हा प्रश्न समोर आहे.'' नागनाथ कदम (बाधित शेतकरी)ङ्ग ङ्गप्रशासनाकडून मदतीची अपेक्षाङ्गपावसामुळे झालेल्या या नुकसानीची संबंधित विभागाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. महसूल आणि कृषी विभागाने हयातनगर परिसरात येऊन तात्काळ नुकसानाची पहाणी करावी आणि पीडित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी आर्त हाक शेतकरी वर्ग देत आहे.

# जिल्हा परिषद पुणे अंतर्गत प्राथमिक शाळांची राज्यस्तरीय शैक्षणिक मुल्यमापनात उल्लेखनीय कामगिरी




पुरंदर तालुका (प्रतिनिधी):-
अनिकेत नितीन काळे

राज्य शैक्षणिक संशोधनाने प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी राज्यभर परिक्षा घेण्यात आली या परिक्षेच्या अधिकृत डॅशबोर्ड नुसार महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद शहरांच्या श्रेणीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची तुलनात्मक आकडेवारी नुसार पुणे जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या सर्व घटकामध्ये उच्च गुणवत्ता दर्शविली आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय मुल्यमापनात राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या श्रेणीमध्ये पुणे जिल्ह्याच्या जिल्हा परिषद शाळांनी प्रथम क्रमांक मिळवणे ही सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी व पालक उपस्थित संयुक्त प्रयत्नांची फलश्रुती आहे.गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित शैक्षणिक निरीक्षण आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम यामुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे. आगामी काळातही जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे मत पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गजानन पाटील (भा.प्र.से) यांनी व्यक्त केले तसेच प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे, शिक्षणाधिकारी श्री.संजय नाईकडे यांनी सर्व संबंधित गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

या मुल्यमापनात पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांची कामगिरी पुढीलप्रमाणे आहे.

वाचन: ८३.१२ % (राज्यात आघाडीवर) लेखन: ८१.८५ % (राज्यात आघाडीवर)

संख्याज्ञान: ९०.२९ % (राज्यात आघाडीवर) संख्येवरील क्रिया: ८६.७९ % (राज्यात आघाडीवर)

या सर्व घटकांमध्ये पुणे जिल्हा परिषद शाळांनी सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.

## ऐन रिलीजच्या तोंडावर केरळ स्टोरी २ सिनेमात सेन्सॉर बोर्डाने सुचवले चक्क १६ बदल

मुंबई : लव्ह जिहाद या मुद्द्यावर आधारित असलेला केरळ स्टोरी या सिनेमाचा दुसरा भाग येत्या शुक्रवारी २७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. ऐन प्रदर्शनाच्या तयारीत असताना टक्क्यांनी कमी करण्यात आले आहेत. बलात्काराची दृश्ये सुद्धा ५० टक्क्यांनी कमी करण्यात आले आहेत, तसेच काही मारहाणीच्या सीन्स मधेही कट्स केले आहेत. काही डायलॉग्स बदलेले गेले त र काही शब्दांना म्यूट करण्यात आलंय. तसेच सिनेमाच स्क्रीन टाइम आणि




सेन्सॉर बोर्डाने चक्क १६ बदल आणि कट्स सुचवले आहेत.

लव्ह जिहाद या विषयावरच्या चित्रपटात बऱ्याच वेळा मुलींना मारहाण, अश्लील कृत्ये, चुंबन यांसारखे दृश्ये दाखवलेली असतात. जी सेन्सॉर बोर्डाच्या मर्यादा ओलांडतात आणि ते भाग सेन्सॉर बोर्ड चित्रपटातून काढून टाकण्याचा किंवा कट्? करण्याचा आदेश देतात. असेच काही सीन्स केरला स्टोरी २ या सिनेमात असल्याने बोर्डाने चक्क १६ कट्स सुचवले आहेत. सीन्स जितके वगळता येतील तितके कमी करण्याचे आदेश दिले आहेत.

बोर्डाच्या आदेशामुळे या सिनेमातील चुंबन सीन्स ५० त्यासोबत व्हॉइस ओव्हर सुद्धा २ मिनिटांनी वाढवण्यास सांगितलं आहे. निर्मात्यांना डायलॉगच्या होशोबाने स्क्रिप्ट जमा करण्याचे आणि चित्रपटात दाखवलेल्या काही सत्य घटनांची योग्य कागदपत्रे जमा करण्याचे आदेश दिले आहेत.विपुल शाहांची निर्मिती आणि कामाख्या नारायण सिंह यांनी दिग्दर्शन केलं आहे. तसेच यामध्ये उल्का गुप्ता, आदिती भाटिया आणि ऐश्वर्या ओझा यांच्या मुख्य भूमिका आहेत. येत्या २७ जानेवारी रोजी हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# सुप्रिया सुळेंच्या होणाऱ्या व्याह्यांनाही भाजपाच्या नव्या कार्यकारिणीमध्ये स्थान

नागपूर : प्रतिनिधी

केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी पक्ष असलेल्या भाजपाने आज आपल्या महाराष्ट्रातील नव्या कार्यकारिणीची घोषणा कार्यकारिणीची घोषणा केली. या प्रदेश कार्यकारिणीत अनेक नव्या चेह-यांना राज्य पातळीवर काम करण्याची संधी दिली आहे. त्याशिवाय आमदार गोपीचंद पडळकर,



केली आहे.

या कार्यकारिणीमध्ये अनेक नव्या चेह-यांना महत्त्वाच्या पदांवर संधी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचे होणारे व्याही अरुण लखानी यांनाही भाजपाच्या नव्या कार्यकारिणीमध्ये स्थान देण्यात आले आहे. अरुण लखानी यांची पक्षाच्या सहकोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज भाजपाच्या महाराष्ट्रातील प्रदेश कृष्णराज महाडिक यांच्यावर पक्षाने नवी जबाबदारी टाकली आहे.

केशव उपाध्ये यांनाही कार्यकारिणीत बढती दिली असून, यापुढे भाजपाच्या मुख्य प्रवक्ते पदाची जबाबदारी नवनाथ बन यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. तर अरुण लखानी यांची सहकोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

दरम्यान, अरुण लखानी हे सुप्रिया सुळे यांचे होणारे व्याही असून, सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती सुळे आणि अरुण लखानी यांचा पुत्र सारंग लखानी यांचा विवाह निश्चित झाल्याची घोषणा हल्लीच झाली होती.

# ६० हजार शेतकरी प्रतीक्षेत; जालन्यात मका खरेदीची गती मंद

भोकरदन (प्रतिनिधी):
सद्दाम मिर्झा

जालना जिल्ह्यात यंदा मका पिकाचे विक्रमी उत्पादन झाले असताना खरेदी प्रक्रियेतील संथ गतीमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहे. संपूर्ण जिल्ह्यात सध्या फक्त १० मका खरेदी केंद्रे कार्यरत असल्याने खरेदी प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू आहे. हेक्टरी सरासरी २९.७६ क्विंटल उत्पादन होत असताना खरेदीचे प्रमाण अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र



आहेत. जिल्ह्यात सुमारे ५७,३४५ हेक्टर क्षेत्रावर मका पेरणी झाली असून अंदाजे ६० हजार शेतकऱ्यांनी मका लागवड केली आहे. यंदा सुमारे १७ लाख क्विंटल मक्याचे उत्पादन झाल्याचा अंदाज आहे. मात्र शासनाने जिल्ह्यासाठी केवळ १ लाख क्विंटल इतकाच खरेदी लक्षांक दिला असून टप्प्याटप्प्याने मिळालेला प्रत्यक्ष लक्षांक फक्त ८,००० क्विंटल आहे. त्यापैकी आतापर्यंत केवळ १,४८४ क्विंटल मका खरेदी करण्यात आला आहे.ङ्गजिल्ह्यात नोंदणी केलेल्या २,२४६ शेतकऱ्यांपैकी केवळ ५५ शेतकऱ्यांकडून मका खरेदी झाली नाराजी आहे.ङ्गया पार्श्वभूमीवर डॉ. कल्याण काळे यांनी जालना जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्राद्वारे तात्काळ मका खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्याची, खरेदी प्रक्रिया गतीमान करण्याची आणि जिल्ह्याला दिलेला खरेदी लक्षांक वाढविण्याची जोरदार मागणी केली आहे. ''शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे,'' असे त्यांनी नमूद केले.ङ्गयावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, त्र्यंबकराव पाबळे, भाऊसाहेब साळुंके, विलास दानवे तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूर्योदय

बुधवार २५ फेब्रुवारी २०२६

संपादकीय

## कायद्यावर आधारित शासन

अमेरिकन प्रशासनाच्या अंदाजानुसार बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' हा इस्लामिक पक्ष पुढील महिन्याच्या निवडणुकीत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करू शकेल आणि म्हणूनच अमेरिका त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेशमध्ये 'जमात-ए-इस्लामी' या संघटनेवर यापूर्वी अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. अलीकडेच शेख हसीना यांची राजवट आरक्षण आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे उलथवून टाकण्यात आली. तिथे युनूस मोहम्मद यांचे हंगामी सरकार सत्तेवर आहे. या सत्तेच्या काळात 'जमात-ए-इस्लामी'ला अधिक महत्त्व मिळत गेले. हसीना यांच्या सरकारकडे युनूस हेही शत्रूपक्षाचे सरकार म्हणून पाहत होते. हे सरकार उलथवून टाकण्यात 'जमात-ए-इस्लामी'ची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे युनूस याच पक्षाच्या सल्ल्याने कारभार करतात आणि धोरणे ठरवतात. हाच पक्ष सत्तेवर यावा, असे त्यांना वाटते. 'जमात-ए-इस्लामी' पक्षाने पारंपरिकपणे शरिया कायद्यावर आधारित शासन आणि महिलांचे कामाचे तास कमी करण्याचा पुरस्कार केला आहे; जेणेकरून त्या मुलांप्रती त्यांची कर्तव्ये पार पाडू शकतील. तथापि, अलीकडेच त्यांनी आपली सार्वजनिक प्रतिमा सौम्य करण्याचा आणि महिलांचा पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. 'जमात-ए-इस्लामी'चे प्रवक्ते मोहम्मद रहमान म्हणाले, की पक्ष भ्रष्टाचारविरोधी, पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मुद्द्यावर निवडणुका लढवत आहे. महिलांसाठी कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे आणि पक्षाची शरिया कायदा लागू करण्याची कोणतीही योजना नाही.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'च्या अनेक नेत्यांनी लोकांवर गंभीर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. पक्षाने वेगळ्या बांगलादेशला विरोध केला होता, कारण तो इस्लामविरोधी असल्याचे मानले जात होते. भारतात बाबरी मशीद पाडल्यानंतर, जमात नेते आणि विद्यार्थी संघटनांवर बांगलादेशमध्ये हिंदूविरोधी दंगली भडकवल्याचा आरोपही करण्यात आला होता. बांगलादेशमधील राजकीय परिस्थिती बदलत असताना तेथील अमेरिकन राजदूतांनी पुनरुज्जीवित इस्लामिक चळवळीसोबत काम करण्याची तयारी दर्शवली. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार अमेरिकेचा अंदाज आहे, की 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशच्या निवडणुकीमध्ये ऐतिहासिक यश मिळवू शकते. 'वॉशिंग्टन पोस्ट'ने मिळवलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार १ डिसेंबर रोजी बांगलादेशी महिला पत्रकारांसोबत बंद दाराआड झालेल्या बैठकीत ढाका येथे तैनात असलेल्या एका अमेरिकन राजदूताने सांगितले, की देश इस्लामिक झाला आणि १२ फेब्रुवारीच्या निवडणुकीमध्ये 'जमात-ए-इस्लामी' पूर्वीपेक्षा चांगले प्रदर्शन करेल. 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्रानुसार 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशवर इस्लामिक कायद्याची आपली धारणा लादण्याचा प्रयत्न करेल, या चिंतेकडे अमेरिकन राजदूताने दुर्लक्ष केले. ते म्हणाले, की जमात शरिया लादू शकते, असे मला वाटत नाही. पक्षाच्या नेत्यांनी अशी भयानक पावले उचलल्यास अमेरिका दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर शंभर टक्के कर लादेल.

'द वॉशिंग्टन पोस्ट'ला दिलेल्या निवेदनामध्ये ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्या मोनिका शिया म्हणाल्या, की डिसेंबरमध्ये झालेली चर्चा ही एक नियमित बैठक होती. ही अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पत्रकारांमधील 'ऑफ-द-रेकॉर्ड' चर्चा होती. त्या म्हणाल्या, की बैठकीदरम्यान अनेक राजकीय पक्षांबाबत चर्चा झाली. अमेरिका कोणत्याही एका राजकीय पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त पसंती देत नाही आणि बांगलादेशमधील लोक निवडत असलेल्या सरकारसोबत काम करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे.

तथापि, 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालात बांगलादेशमधील अमेरिकन राजदूत एका महत्त्वपूर्ण संक्रमणादरम्यान देशाच्या राजकीय भविष्याकडे कसे पाहतात, यावर प्रकाश टाकला आहे. ढाका येथील दूतावासाच्या बैठकीत, एका अमेरिकन अधिकाऱ्याने सूचित केले, की 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्क साधण्याव्यतिरिक्त मिशनचे कर्मचारी 'हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेश' आणि 'इस्लामी आंदोलन बांगलादेश'सह इतर रूढीवादी गटांसोबतही काम करत आहेत. ते इस्लामिक राजकीय पक्षांमध्येही सामील होऊ शकतात. राजनयिकाने जोर देऊन सांगितले, की 'जमात-ए-इस्लामी' सत्तेत आली आणि अमेरिकेला मान्य नसलेली धोरणे लागू केली,

# मुंडे महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन

मंडणगड (प्रतिनिधी) दि. :येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व कर्मवीर भि. रा. तथा दादा इदाते वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळावा रविवार दिनांक ०१ मार्च २०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता महाविद्यालयामध्ये संपन्न होणार आहे. मेळाव्याकरिता संस्थापदाधिकारी, प्राध्यापक वर्ग व माजी विद्यार्थी उपस्थित राहून आपल्या विचारांची देवाण-घेवाण करणार आहेत. ङ्गमहाविद्यालयाने बेंगलोर स्थित 'नॅक'या संस्थेकडून चौथ्या वेळी आपले यशस्वी मूल्यांकन करून घेतले असून सध्या पाचव्या पुनर्मूल्यांकनाची तयारी करीत आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे खूपच मोलाचे योगदान लाभते. महाविद्यालयाने आजपर्यंत सामाजिक, शैक्षणिक विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय उपक्रम राबविले आहेत. याबाबत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना अवगत करणे व या सर्व विद्यार्थ्यांची सद्यस्थिती व त्यांच्या व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनातील प्रगती जाणून घेण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. विविध क्षेत्रात विखुरलेल्या माजी विद्यार्थ्यांचा परस्परांतील ऋणानुबंध वृद्धींगत व्हावा, त्यांचे महाविद्यालयाशी दृढ नाते निर्माण व्हावे व महाविद्यालय व संस्थेच्या विकासकार्यात माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे असे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर व उपप्राचार्य डॉ. विष्णु जायभाये यांनी सांगितले. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदर मेळाव्यास उपस्थित रहावे असे महाविद्यालयाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.



# सती चिंचघरी प्राथमिक विद्यालयात हिंद दी चादर कार्यक्रम उत्साहात संपन्न

उपसंपादक प्रदीप पवार

सह्याद्री शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा खेर्डी चिंचघरी ( सती ) या विद्यालयात शासन आदेशानुसार ''हिंद दी चादर'' या विशेष कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. शीख धर्मातील नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदान आणि कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ''हिंद दी चादर'' ही उपाधी त्यांना हिंदू धर्माच्या रक्षणासाठी दिलेल्या महान बलिदानामुळे प्राप्त झाली आहे. बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन विद्यालयात करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादुर यांच्या जीवनकार्यावर आधारीत गीत ऐकवण्यात आले. या दिनाचे औचित्य साधून प्रभात फेरी, निबंध स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वाचन स्पर्धा, समूह गायन स्पर्धा इत्यादीचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते. शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका कांबळे मॅडमनी श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शौर्य गाथेची सविस्तर माहिती आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना दिली. शाळेचे मुख्याध्यापक सकपाळ आपल्या मार्गदर्शनपर भाषणात गुरु तेग बहादुर यांच्या त्याग, धैर्य आणि धर्मनिष्ठेचे महत्त्व सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना सत्य, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जागरूकता आणि प्रेरणा निर्माण झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक अरविंद सकपाळ, मनीषा कांबळी, रश्मी राजेशिर्के, संदेश सावंत, अपूर्वा शिंदे, वृषाली राणे, अर्चना देशमुख, ज्योती चाळके, रूपाली खरात, वर्षा सकपाळ, शितल पाटील, स्वरा भुरण, विजया मौजे यांनी मेहनत घेतली.



# गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास अंतर्गत + श्रेणी प्राप्त

रायगडमधून अभिनंदनाचा वर्षावङ्गतळा प्रतिनिधी कृष्णा भोसले. ङ्ग: श्री गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत बाह्य मूल्यांकनात अ + श्रेणी प्राप्त करून राज्यातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थेमध्ये शाळेने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. त्यानुसार सन २०२४- २०२५ मध्ये राज्यातील १,०२६७५ शाळांनी स्वयं मूल्यांकन पूर्ण केले. स्वयं मूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळापैकी सन २०२५-२०२६ मध्ये १०,७७२ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड करण्यात आली होती त्यापैकी १०,६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण झाले. या प्रक्रियेत राज्यातील ४२९ शाळा व रायगड जिल्ह्यातील १० शाळांना अ+ श्रेणी प्राप्त झाली असून त्यामध्ये गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय जिल्ह्यातील एक शैक्षणिक दृष्ट्या नामवंत शाळा ठरली आहे. गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालय, संगणक कक्ष, विद्यार्थ्यांना पिण्यासाठी आरओचे पाणी, स्मार्ट बोर्डद्वारे अध्यापन, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, विविध सराव परीक्षांचे आयोजन, विविध परीक्षेसंबंधी समुपदेशन यासारखे उपक्रम यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.ङ्ग्या उपक्रमांचे फलित म्हणून अनेक विद्यार्थ्यांनी दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर कला, क्रीडा, विज्ञान प्रदर्शन, निबंध, वक्तृत्व आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. व्यक्तिमत्त्व विकास, नैतिक शिक्षण आणि पर्यावरण जनजागृती यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली आहे.ङ्ग उच्चविद्याविभूषित शिक्षक वर्ग व गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक वातावरण यामुळेच गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास अ + श्रेणी प्राप्त झाली आहे. या यशाबद्दल तळाचे गटविकास अधिकारी श्री महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी सौ सुरेखा तांबट, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री अनंत जोशी, श्री नंदकुमार वेदक, श्री मारुती शिर्के, अध्यक्ष श्री मंगेश देशमुख, उपाध्यक्ष तथा वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री महेंद्रशेठ कजबजे, शाळा समितीचे चेअरमन श्री श्रीराम कजबजे, प्राथमिक विभागाचे चेअरमन श्री महादेव बैकर, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्री बी के पटेल, खजिनदार श्री चंद्रकांत रोडे, कार्यकारिणी सदस्य श्री दिपक कोटिया, डॉ श्रीनिवास वेदक, डॉ सतीश वडके, ॲड कौस्तुभ धामणकर, विशेष निमंत्रित सदस्य श्री दत्तात्र्यय सप्रे, श्री चंद्रकांत खातू, मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे, पर्यवेक्षक श्री महादेव लोकरे, समितीचे सर्व सदस्य, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. शाळेच्या प्रगतीत संस्था पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि स्थानिक ग्रामस्थांचा मोलाचा वाटा आहे.

# संत निरंकारी मिशनचे चिंचघरी सती येथील नदीपात्रात स्वच्छ जल स्वच्छ मन अभियान संपन्न

उपसंपादक प्रदीप पवार. चिपळूण तालुक्यातील चिंचघरी ते चिंचघरी येथे सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या कृपेने बाबा हरदेव सिंहजी महाराजांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा घेत संत निरंकारी मिशन आणि संस्कृती मंत्रालय भारत सरकार यांच्या सहयोगाने येथील कुटगिरी नदीच्या नदीपात्रात प्रोजेक्ट अमृत अंतर्गत ''स्वच्छ जल स्वच्छ मन''अभियान राबवण्यात आले. चिंचघरी सती येथील आदर्श नगर ते जेके चाळ दरम्यानच्या नदीपात्रात सकाळी ८ ते ११ या वेळेत राबविण्यात आलेल्या जलसफाई अभियानात २०० सेवादल तसेच साध संगतने सहभाग घेतला होता. यावेळी नदीपात्रातील पाच टन कचरा एकत्रित करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली आणि नदीने खऱ्या अर्थाने मोकळा श्वास घेतला. हे संपूर्ण जलस्वच्छता अभियान प.आ. मधुकर पंडितजी- मुखी तुरंबव, प.आ.लक्ष्मण बोबलेजी- मुखी घोणसरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. यावेळी राकेश चाळके- माजी सरपंच चिंचघरी सती, महेश चाळके- माजी उपसरपंच, राजेश चाळके- माजी उपसरपंच, संतोष यादव- व्यावसायिक इत्यादी उपस्थित होते. यावेळी बोलताना प.आ. मधुकर पंडितजी बोलले की,जल संरक्षण आणि जल स्वच्छता एका दिवसासाठी मर्यादित न राहता ती जीवनाचा एक भाग बनावी. सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांचा संदेश आहे की, आपण या धरतीला येणाऱ्या पिढ्यांसाठी पहिल्यापेक्षा अधिक सुंदर आणि स्वच्छ ठेवायचे आहे. हे जल स्वच्छता अभियान पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण तसेच स्वच्छतेच्या संदेशाला समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात प.आ.आशिष बामणेजी- सेवादल संचालक, प.आ.मधुरा लवंदेजी- सेवादल संचालिका यांचे मोलाचे योगदान लाभले.





# कळंबोलीतील पाणी टंचाई विरोधात स्त्री शक्ती फाउंडेशनचा सिडको कार्यालयावर धडक मोर्चा



पनवेल प्रतिनिधी–

सुनील जाधव नवी मुबंई, पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील कळबोंली प्रभाग ८ येथील के एल ४, सेक्टर ४ ए, ई परिसरा मधे गेली ८ दिवसा पांसुन पाणी पुरवठा पुर्ण पणे टप्प झाला असुन असंख्या नागरिकांवर अक्षरशः पाणी बाणी ओढवली आहे.लोकांना जेवणासाठी,पिण्यासाठी ,बाथरुम व दैनदिंन कामासाठी पाणी उपलब्ध न झाल्याने लोक हवालदिल झाले आहेत. सद्या बोर्डाच्या परिक्षा सुरु असताना विद्यार्थ्यांना पाण्यासाठी पैसे मोजावे लागत आहे.ही फार मोठी गंभीर समस्या असुन स्थानिक प्रशासन डोळे मिटुन गप्प का? वारंवार या बाबत तक्रारी करुन जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले जात आहे.त्यामुळे नागरिकांमधे संतापाची लाट उसळुन हजोरांच्या संख्येंने मोर्चा काढावा लागला.या पुढे सिडको प्रशासनाने पाण्याची समस्या तातडीने न सोडविल्यांस जोरदार आदोंलन छेडण्यांत येईल असा ईशारा देण्यांत आला.

# ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग तळा यांचे माध्यमातून खैराट येथे जलजिवन मिशन अंतर्गत जल अर्पण सोहळा संपन्न

तळा प्रतिनिधी कृष्णा भोसले

ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, तळा यांच्या माध्यमातून ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द येथील मौजे खैराट येथे जल जीवन मिशन अंतर्गत ''जल अर्पण सोहळा'' दिनांक २३/०२/२०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.ङ्गकार्यक्रमाची सुरुवात पाण्याच्या टाकी येथे विधिवत कलश पूजनाने करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, महिला मंडळ, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''पाणी आडवा, पाणी जिरवा'', ''जल है तो कल है'', ''पाणी हेच जीवन'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला व जनजागृती करण्यात आली.ङ्गप्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर नृत्य सादर करत प्रभात फेरी काढली. कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी जल संकल्प / जल शपथ घेऊन पाण्याचे संवर्धन व योग्य वापर करण्याचा निर्धार केला.ङ्गअंगणवाडी




सेविकांनी पाण्याची गुणवत्ता तपासणी प्रत्यक्ष करून दाखवली व सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत मार्गदर्शन केले.ङ्गयानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत स्वागत समारंभ व सभा आयोजित करण्यात आली.ङ्गमा. श्री. एकनाथ कोठेकर साहेब (डेप्युटी इंजिनिअर) व श्रीम. अमृता कांबळे मॅडम (ज्युनिअर इंजिनिअर) यांनी पाण्याचे महत्त्व व जलसंवर्धनाची गरज याविषयी मार्गदर्शन केले.ङ्गश्री. प्रविण आंबार्ले (सरपंच) यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले.ङ्गया कार्यक्रमासाठी श्री. अजय सावंत (उपसरपंच), लक्ष्मण भोईर (माजी उपसरपंच), सौ. हर्षदा भोईर (मा. सदस्य), श्री. राजेश खैरे, ग्रामपंचायत अधिकारी श्री. तुकारामशेट नाडकर, विनीत पाडळकर साहेब, सिद्देश्वर घाले , श्री. राठोड सर, श्री. कुलकर्णी सर, विजय आंबार्ले तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.ङ्गकार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात व यशस्वीरित्या संपन्न झाला.

# श्री स्वामी समर्थ फाऊंडेशन व हॉस्पिटल शिरगावचा सामाजिक संवेदनशीलतेचा दीप उजळवणारा प्रेरणादायी उपक्रम

समाजातील दुर्बल, वंचित आणि विशेष गरजा असणाऱ्या घटकांसाठी कार्य करणे ही केवळ जबाबदारी नसून ती एक सामाजिक बांधिलकी असते. या बांधिलकीचा जिवंत व प्रेरणादायी आदर्श श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल व फाउंडेशन, शिरगाव (ता. चिपळूण) यांच्या माध्यमातून पुन्हा एकदा समाजासमोर उभा राहिला.आज सांगली मिशन सोसायटी संचालित प्रतिक्षा विशेष निवासी शाळा, विलवडे (ता. लांजा, जि. रत्नागिरी) येथे फाउंडेशनच्या सहकार्यातून एक अत्यंत अर्थपूर्ण सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेच्या दैनंदिन गरजांसाठी तसेच येथे निवासी असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी विविध आवश्यक साहित्य व भेटवस्तू सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून वाटप करण्यात आले.ङ्गही केवळ साहित्य वाटपाची औपचारिकता नव्हती, तर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा, आत्मविश्वासाचा आणि मायेचा हात देणारा एक संवेदनशील प्रयत्न होता. शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि भावनिक आधार या चारही पायांवर उभा असलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे.



भेटवस्तू स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, डोळ्यांत दिसणारी चमक आणि मनात निर्माण झालेली सकारात्मक भावना हीच या कार्यक्रमाची खरी पावती ठरली.ङ्गया कार्यक्रमास श्री स्वामी समर्थ फाउंडेशन व हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. विशाल पेटकर, फाउंडेशनचे सक्रिय सदस्य डॉ. अविनाश पाटील, देवरुख-देवळे परिसरातील सुप्रसिद्ध व सामाजिक कार्याची जाण असलेले डॉ. गणेश देसाई, तसेच प्रतिक्षा विशेष निवासी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या कार्याची प्रशंसा करत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व पुनर्वसनासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले.ङ्गयावेळी बोलताना डॉ. विशाल पेटकर यांनी सांगितले की, ''दिव्यांग मुले ही समाजाची जबाबदारी आहेत. त्यांना योग्य संधी, प्रेम आणि आधार मिळाला तर तेही आपल्या कर्तृत्वाने समाजात मोलाचे योगदान देऊ शकतात. श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल व फाउंडेशन केवळ वैद्यकीय सेवा देण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने कार्य करत राहील.'' याच वेळी त्यांनी प्रतिक्षा विशेष निवासी शाळेला यापुढेही सर्वतोपरी सहकार्य करण्याची ठाम ग्वाही दिली.ङ्गहा उपक्रम फाउंडेशनच्या इतिहासातील एक अत्यंत सुंदर, समाजोपयोगी आणि प्रेरणादायी अध्याय ठरला आहे. सामाजिक जाणिवेतून राबविण्यात आलेले असे उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडविण्याची ताकद ठेवतात. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, त्यांच्यात आत्मसन्मान जागविणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणे हेच खरे समाजकार्य होय.ङ्गश्री स्वामी समर्थ हॉस्पिटल व फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे समाजात माणुसकी, सहवेदना आणि सेवाभाव यांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. अशाच प्रकारे समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबविले जावेत आणि अधिकाधिक संस्था व व्यक्तींनी या कार्यात सहभागी व्हावे, हीच अपेक्षा आणि सदिच्छा.

# लोकमानस

## १ मुलखावेगळी माणस

संगीत विश्वातला दुर्मीळ खजिना

संगीत किंवा गाणं हा सर्वांच्याच आवडीचा भाग असतो. त्यामुळे सर्वजण गाणं ऐकतात आणि गुणगुणत सुद्धा. गाणं ऐकण्याचं पूर्वीपासूनचं मुख्य साधन म्हणजे रेडिओ. मात्र काळानुसार आता हे रेडिओ ग्रामोफोन कुठेतरी कालबाह्य होत चाललेले आहेत. पण हेच आपल्या पुढच्या पिढीला रेडिओ, ग्रामोफोन नेमकं काय असतं हे दाखवण्यासाठी एक अवलिया प्रयत्न करतोय. छत्रपती संभाजीनगर




शहरातील संजय पवार यांनी या सर्व गोष्टींचा संग्रह तयार केलेला आहे.


मूळचे लातूर जिल्ह्यातील असलेले संजय पवार हे सध्या संभाजीनगर शहरातील एका महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांना लहानपणापासूनच या सर्व गोष्टींचं आकर्षण आणि कुतहल होतं. त्यामुळे आता त्यांच्याकडे दीडशे वर्षापासूनचे सर्व रेडिओ, ग्रामोफोन यांचा दुर्मिळ संग्रह आहे. पवार यांच्याकडे १० ग्रामोफोन, २ रेडिओ ग्राम आणि १२५ रेकॉर्ड प्लेअर आहेत. तर २००० तबकड्या त्यांनी संकलित केलेल्या आहेत. त्याचबरोबर सुटकेस सारखे दिसणारे आठ व्हिडिओ प्लेयर त्यांच्याकडे आहेत.पवार यांच्याकडे लॅपटॉप सारखे दिसणारे चार रेकॉर्ड प्लेयर आहेत. तसेच काही पॉकेट रेडिओ देखील त्यांनी संकलित केलेलं आहे. त्यांनी हे सर्व साहित्य मुंबईच्या चोर बाजारातून तसेच संभाजीनगर येथील रविवारच्या बाजारामधून गोळा केलंय. त्याचबरोबर ते देशभरातून संग्राहक आहेत. विंटेज वस्तूंचं कलेक्शन करणारे त्यांच्याकडून ते साहित्य मागत असतात.आता या दुर्मिळ वस्तूंचे पार्ट कुठेही उपलब्ध नाहीत. त्यांना दुरुस्ती करणारे मेकॅनिक देखील आता नाहीयेत. म्हणून संजय पवार स्वतः हे सगळं शिकत आहेत. सर्व वस्तू ते स्वतः दुरुस्त करतात. त्यांना त्यांच्या संग्रहाचं छान संग्रहालय तयार करायचा आहे. पुढच्या पिढीला या सर्व गोष्टी माहिती व्हाव्यात म्हणून ते सर्वांसाठी खुले करणार आहेत. हेच त्यांचं ध्येय असल्याचं संभाजी पवार सांगतात.लहानपणापासून रेडिओ ग्रामोफोन बघायचो. पण तेव्हा घरची परिस्थिती नव्हती. त्यामुळे घेणं कधी शक्य झाले नाही. कार्यक्रमांमध्येच रेडिओग्राम फोन बघायचा योग यायचा. मात्र नोकरी लागल्यानंतर आपल्या पुढच्या पिढीला काहीतरी देण्यासाठी मी हा संग्रह करण्याचा ठरवलं. मी लवकरच याचं संग्रहालय बनवून ते सर्वांसाठी खुले करणार आहे. हे सर्व साहित्य मी गोळा केलेले आहे. आता माझ्याकडे सगळ्या दुर्मिळ साधमांचा संग्रह असल्याचे संजय पवार सांगतात.

## २.....असा लागला शोध

शोध छपाई तंत्राचा

आज आपण कॉम्प्युटरवर जे काही लिहितो ते एका बटणाने जसेच्या तसे छापून घेऊ शकतो. त्यात विशेष काही वाटत नाही. पण शोध लागल्यानंतर ती गोष्ट समजून घेणे वेगळे आणि ते शोधणे वेगळे. छपाई करणे म्हणजेच एखादे चित्र किंवा वाक्य वारंवार एकाच प्रकारे उमटवता येणे.

छपाईच्या बाबतीत मान्यतेप्रमाणे चीन हा देश पहिला मानला जातो. इ.स. पूर्व ५०० ते १००० मध्ये येथे छपाई झाल्याचा पुरावा आहे.




परंतु भारत व चीन या देशांचे, शोधांची नोंद, त्यांचे पुढच्या पिढीला हस्तांतर याचे रेकॉर्ड अगदी वाईट आहे. वेरूळच्या कैलासाचे मुख्य जनक कोण, लेण्याचा अभियंता कोण, याची काहीच नोंद नाही. नि:स्वार्थ वृत्ती कौतुकास्पद, पण पुढच्या पिढय़ांना त्याची पूर्वमाहितीही आवश्यक. तर खऱ्या अर्थाने पहिल्या, सतत छापू शकणाऱ्या व यांत्रिक पद्धतीने छापणाऱ्या प्रिंटरचा शोध जर्मनीच्या गुटेनबर्ग या शास्त्रज्ञाने लावला आणि जगात नव्या क्रांतीला सुरुवात झाली. त्यापूर्वी बहुतेक पुस्तके ही हाताने लिहिलेली असत. फार फार तर लाकडात कोरीव काम करून तयार केलेल्या ब्लॉकच्या ठशांद्वारे छपाई केली जात असे. अर्थात हे काम खूप अवघड, खर्चिक आणि वेळखाऊ होते. अशा पद्धतीने तयार केलेली काहीच पुस्तके त्या वेळी जगात उपलब्ध होती. ती बहुतांश श्रीमंत व्यक्ती, धर्मगुरू यांच्याकडे किंवा विद्यापीठांमध्ये असत. ही पुस्तके इतकी मौल्यवान असायची की विद्यापीठामध्ये ती बाकाला साखळीने कुलूपबंद केलेली असत. वाचणाऱ्यांनी ती तिथेच वाचावीत. त्यांची चोरी होऊ नये म्हणून हा सर्व खटाटोप असायचा. गुटेनबर्गने छपाईची पद्धत शोधून काढली आणि हे सर्वच बदलून गेले. सर्वसामान्यांना पुस्तके आणि त्या माध्यमातून ज्ञान मिळू लागले.

धातुकामाचे विशेष कौशल्य त्याने आत्मसात केले होते. त्यातूनच त्याने अक्षरांचे साचे तयार करून त्यातून धातूची अक्षरे तयार केली. अशी अक्षरे एकत्र ठेवून त्यातून शब्द, वाक्ये तयार केली. त्यावर शाई लावली आणि विशेष तंत्राद्वारे हे कागदावरून फिरवले की छपाई सुरू होत असे. अशा प्रकारे त्याने अनेक माहिती छापून तयार केली


## ३ चलती का नाम गाडी

जीप इंडियाची सर्वात आरामदायी जीप मेरिडियन

जीप इंडियाने मेरिडियन ट्रॅक एडिशनचे नुकतेच अनावरण केले, ही एक नवीन मर्यादित धावण्याची ऑफर आहे जी मेरिडियनच्या प्रीमियम अपीलला अधिक ठळक रस्त्याची उपस्थिती आणि अर्थपूर्ण आरामदायी अपग्रेड्ससह बळकट करते विशेषतः नवीन १४० मिमी फुलफॉरवर्ड स्लाइडिंग सेकंड रो, जी ही आतापर्यंतची सर्वात आरामदायी जीप मेरिडियनने बनवली आहे.

मेरिडियन ओव्हरलँडवर बनवलेले, ट्रॅक एडिशन ग्राहकांना ७ सीटरची अधिक अर्थपूर्ण व्याख्या देते, जीपच्या तयार केलेल्या डिझाइन आणि प्रामाणिक क्षमतेशी खरे राहते. मॉडेलमध्ये जीप कॉन्फिडन्स ७ देखील आहे, जो सात वर्षांपर्यंतची वॉरंटी, खात्रीशीर बायबॅक, देखभाल पॅकेजेस, रोडसाईड असिस्टन्स आणि प्राधान्य सेवा प्रदान करतो संपूर्ण मनःशांती सुनिश्चित करतो.

मेरिडियन ट्रॅक एडिशनमध्ये फोकस केलेल्या स्टाइलिंग ॲडिशन्स आहेत जे त्याच्या उद्देशपूर्ण स्टायलिंगला बळकटी देतात:



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक सूर्योदय

बुधवार २५ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## नागोठणे पोलीस ठाण्याची दमदार कामगिरी;अपहरित मुलगी वैज्ञानिक व तांत्रिक तपासाच्या आधारे सहा तासांच्या आत आई-वडीलांच्या ताब्यात

हसंपादक-: नारायण म्हात्रे

नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील सुकेळी येथून लहान मुलगी हरवली होती



व या गुन्ह्याची नागोठणे पोलिस ठाण्यात लागलीच नोंद करून र. क्र. ४२/२०२६ कलम १३७ (२) अन्वये दाखल गुन्ह्यातील अपहरित बालिका हि २१/०२/२०२६ पासून बेपत्ता झाल्याची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात करण्यात आली होती याकामी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो.नि. सचिन कुलकर्णी यांनी तात्काळ दोन पथके रवाना करून सीसीटीव्ही फुटेज याचे आधारे गुन्ह्यातील अपहरित मुलगी हिचा शोध सुकेळी परिसरात घेतला असता सदर मुलगी ट्रकने पनवेल येथे गेली असल्याचे समजल्याने पनवेल येथून शिवडी मुंबई परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली. शिवडी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी करून शोध घेतला असता ती शिवडी परिसरामध्ये झोपडपट्टी भागामध्ये मिळून आलेली आहे. सदर अपहरित मुलगी हीस शिवडी पोलीस ठाण्यात नेऊन जवळच्या वैद्यकीय सरकारी रुग्णालयामध्ये तिची वैद्यकीय तपासणी करून या मुलीला ताब्यात घेऊन तिच्या आई-वडिलांकडे सोपवण्यात आले. सदरच्या या मुलीवर आई-वडील रागावल्यामुळे ती घरातून रागावून निघून गेली असल्याची माहिती या मुलीने दिली.ङ्ग सदरची कामगिरी रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो.नि सचिन कुलकर्णी यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष देत पोलिस उपनिरीक्षक पावरा, पोलिस निरीक्षक हवालदार नागावकर, महिला सहायक फौजदार संचिता सानप यांना आदेश देत या मुलीला शोधून काढण्यात यशस्वी कामगिरी केलेली असून रायगड पोलीस दलातील नागोठणे पोलीस ठाण्यांनी केलेल्या योग्य तपासाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांना राज्यस्तरीय जीवन गौरव रक्तदाता पुरस्काराने सन्मानित!

कर्जत:जयेश जाधव

कर्जत मधील सार्वजनिक रक्तदाते कर्जत नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक राजाभाऊ कोठारी सर यांना नुकताच जप जीवाला बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने नुकताच राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार - २०२६ देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांना रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वामी समर्थ प्रतिष्ठान, मांडा, टिटवाळा (पूर्व) येथे देण्यात आला.ङ्गङ्गरायगड भूषण,



महारक्तवीर, सार्वजनिक रक्तदाता, रक्तदान शिबिर संयोजक राजेश मधु कांता शांतीलाल कोठारी यांना शिक्षण, आरोग्य, धार्मिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, व रक्तदान क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण, दिर्घकालीन आणी अतुलनीय सेवेबद्दल ''राज्य स्तरीय जीवन गौरव पुरस्कार सन २०२६ स्मृतीचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.ङ्गङ्गया पुरस्कार सोहळ्या प्रसंगी, जप जीवाला बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष एन. ए. कदम, उपाध्यक्ष सौ करूया सचिन गगे- बांगर, तुकाराम (नाना) सुरेखा दत्तात्रय मोंडकर, निवड समिती अध्यक्ष राष्ट्रीय समाजभूषण, समाजसेवक ठाणे किसन गिरजाबाई परशुराम बोंद्रे, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रकाश शाह तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांनी राजाभाऊ कोठारी सरांचे विशेष कौतुक तथा अभिनंदन केले.आज पर्यंत एकूण ५३४ रक्तदान शिबिरे आयोजित करून, एकूण ६४१७१ रक्त पिशव्या संकलित केल्या आहेत व स्वतः ११३ वेळा रक्तदान केले आहे. आजपर्यंत त्यांना महाराष्ट्र राज्य शासना तर्फे, विविध संस्थे तर्फे अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.ङ्ग ६ मार्च २०२६ रोजी रायगड जिल्ह्याचा महत्वाचा '' रायगड भूषण पुरस्कार '' रायगडच्या पालकमंत्री आदरणीय आदरणीय तटकरे याच्या शुभ हस्ते देऊन गौरविण्यात आले आहे.तसेच १९ ऑगस्ट २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन दिल्ली येथे ''महारक्तवीर '' या पुरस्काराने लदाख चे उपराराज्यपाल महामहिम कविंद्र गुप्ताजी यांचे शुभहस्ते गौरविण्यात आले.

## धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसबाबत शासन सकारात्मक; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन लवकरच निर्णय - राज्यमंत्री योगेश कदम

मुंबई, दि. २४ फेब्रुवारी, २०२६ : विधानसभेत लक्षवेधीवर उत्तर देताना मा. मंत्री श्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले की, धान उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनपर (बोनस) रकमेबाबत शासन सकारात्मक आहे. मात्र, रक्कम योग्य व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यातच पारदर्शकपणे पोहोचावी, यासाठी नोंदणी प्रक्रियेचा आढावा घेणे आवश्यक आहे.ङ्गङ्गमागील तीन पणन हंगामातील आकडेवारीनुसार ङ्ग

२०२२-२३ : ₹८२३ कोटी खर्च; खरेदी १.५० कोटी क्विंटलपेक्षा अधिकङ्ग २०२३-२४ : ₹१३७८ कोटी खर्च; खरेदी १.०७ कोटी क्विंटलङ्ग २०२४-२५ : ₹१६२८ कोटी खर्च; खरेदी ९९.६८ लाख क्विंटलङ्गङ्गरक्कम वाढत असताना खरेदीचे प्रमाण घटल्याचे दिसून येते. त्यामुळे बोनस देण्यास शासन विरोधात नसून, त्यामध्ये पारदर्शकता आणि अचूकता वाढवणे गरजेचे असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले.ङ्गङ्गपूर्वी केवळ सातबारा आधारे नोंदणी होत असल्याने काही ठिकाणी गैरप्रकार आढळून आले. आता शासनाने आधारकार्ड सक्ती, बँक खाते लिंकिंग आणि थेट लाभ हस्तांतरण ()



प्रणाली लागू केली आहे. पुढील टप्प्यात कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि अधिक सक्षम डिजिटल पडताळणी यंत्रणा लागू करण्याचाही विचार सुरू आहे.ङ्गङ्गबोनसबाबतचा अंतिम निर्णय कॅबिनेटसमोर मांडला जाणार असून मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेण्यात येणार आहे. ''आमचे सरकार शेतकरीहिताच्या निर्णयांबाबत कटिबद्ध आहे. बोनस देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल,'' असा विश्वास मा. मंत्री श्री योगेश कदम यांनी व्यक्त केला.ङ्गङ्गमागील हंगामातील उर्वरित रक्कम पुढील तीन महिन्यांत वितरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.ङ्गङ्गशासनाचे उद्दिष्ट स्पष्ट आहे धान उत्पादक शेतकऱ्यांना योग्य वेळी, योग्य लाभ मिळाला पाहिजे आणि कोणताही गैरप्रकार थांबवला पाहिजे.

## चिपळूणमध्ये लाच घेताना PSI च्या सहकाऱ्याला अटक

चिपळूण :- चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथील पोलीस उपनिरीक्षकाच्या सांगण्यावरून लाच स्वीकारत असताना त्यांच्या सहकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याने पोलीस प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.सावर्डे



पोलीस स्टेशन येथे मयताच्या वारसदारांना विमा रक्कम मिळविण्यासाठी क्लेम ट्रिब्युनल कोर्टात दावा दाखल करावयाचा होता. त्यासाठी अपघातातील वाहनाचा आरटीओ तपासणी अहवाल व डीओआर फॉर्म देण्याकरिता पोलीस उपनिरीक्षक मनिष कांबळे यांनी तक्रारदाराकडे सुरुवातीला २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार दिली.ङ्ग ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपअधीक्षक अविनाश पाटील यांच्या पर्यवेक्षणाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरीचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्र जाधव, सुहास रोकडे व त्यांच्या पथकाने केली.

## गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहीदी दिनानिमित्त माणगावच्या श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये भव्य अभिवादन

प्रतिनिधी - भूषण शिसोदे

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी दिनानिमित्त आज संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांमध्ये अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याच मोहिमेचा भाग म्हणून माणगाव येथील श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये हा ऐतिहासिक दिवस अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला.ङ्गमान्यवरांची प्रमुख उपस्थितीङ्गया कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माणगावचे नगरप्रमुख श्री. शंकर शिंदे सर उपस्थित होते. तसेच, भारतीय सैन्यातील निवृत्त अधिकारी आणि चॅरिझन फाउंडेशनचे अध्यक्ष, तसेच शिख सेवा वेलफेअर असोसिएशन (रायगड) चे सचिव कॅप्टन निर्मल सिंग रंधावा यांची विशेष उपस्थिती लाभली. शाळेच्या संस्थापिका श्रीमती बिजाक्षी रॉय हेगडे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.ङ्गमानवता आणि बलिदानाचा संदेशङ्गकार्यक्रमादरम्यान गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी मानवता, न्याय आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या महान बलिदानाचा इतिहास मांडण्यात आला.ङ्गकॅप्टन निर्मल सिंग रंधावा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, गुरुजींचे बलिदान हे जगाच्या इतिहासातील अद्वितीय उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन इतरांच्या



धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षण केले.ङ्गनगरप्रमुख शंकर शिंदे यांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की, अशा महापुरुषांच्या बलिदानाची माहिती नवीन पिढीला होणे ही काळाची गरज आहे.ङ्गविद्यार्थी आणि शिक्षकांचा सहभागङ्गशाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी गुरुजींच्या शिकवणीवर आधारित भाषणे आणि कविता सादर केल्या. ''सरबत दा भला'' (सर्वांचे कल्याण) हा संदेश देऊन या कार्यक्रमाची सांगता झाली. श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा आणि बलिदानाची भावना वृद्धिंगत झाली.ङ्गकार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या संस्थापिका श्रीमती बिजाक्षी रॉय हेगडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफिससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )